# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


---

क्रमांक :- तंशिसं/विकाना/ईबीसी/२०१७/ 1098

दिनांक :- 26 APR 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- शैक्षणिक शुल्क 15-16 मधील आर्थिकदष्या मागासवर्गीय विदयार्थाना शैक्षणिक शुल्काची (ई.बी.सी.) प्रतिपुर्ती अदा केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक शुल्क 2015-16 मधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती मंजूरीचे आदेश या कार्यालयामार्फत काढण्यांत आलेले आहेत. आपल्या संस्थेंनी ई.बी.सी. ची रक्कम विद्यार्थ्यांना अदा केली किंवा नाही याबाबत ब-याच संस्थेकडून या कार्यालयास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यांत आलेले नाही. संस्थेतील विद्यार्थ्यांना ईबीसी रक्कम अद्याप पर्यंत संस्थेकडुन मिळाली नसल्याबाबत तसेच संस्थेकडुन देण्यात आलेली ई.बी.सी. रक्कम कमी देण्यात येत असल्याचे विद्यार्थ्यांनी या कार्यालयास कळविलेले आहे.

तेव्हा आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2015-16 मधील ईबीसी ची रक्कम विद्यार्थ्यांना अदा केली असल्यास विद्यार्थ्यांचे नावासहीत रेव्हेन्यू स्टॅपवर सही घेतलेले उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थ्यांचे वाटप विवरणपत्र (मुद्रांक पावत्यासह) या कार्यालयास,सदर पत्र कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासुन दोन दिवसाच्या आत सादर करावे. अन्यथा शैक्षणिक वर्ष 2015-16 च्या ई.बी.सी. मंजूर रक्कमेवर प्रतिदिवस 1% च्या हिशोबाने व्याजाची रक्कम आकारण्यात येईल तसेच याबाबत वरिष्ठ कार्यालयास देखील अहवाल कळविण्यात येईल. याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.